महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांकः प्रतिनि-२०१९/प्र.क्र.२४/का.१४
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक: २८ मार्च, २०१९

आदेश

श्री.सुनिल रामचंद्र जोशी, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांची सामान्य प्रशासन विभागाच्या अधिनस्त असलेल्या **नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्थेमध्ये सहाय्यक प्राध्यापक वर्ग-१** या पदावर **तीन** वर्ष कालावधीसाठी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ) श्री.सुनिल रामचंद्र जोशी, अवर सचिव हे ज्या तारखेला प्रतिनियुक्तीच्या पदावर रूजू होतील त्या तारखेपासून प्रतिनियुक्तीच्या सेवेचा प्रारंभ होईल आणि ती सेवा ज्या तारखेला ते आपल्या शासकीय पदाचा कार्यभार पुन्हा स्विकारतील त्या तारखेला समाप्त होईल.

ब) जर त्यांची सेवा लोकसेवेच्या हिताच्या दृष्टीने शासनाला आवश्यक वाटली तर प्रतिनियुक्तीचा कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्यांना परत बोलावून घेण्याचा अधिकार शासन/सक्षम प्राधिकाऱ्यास राहील.

क) जर त्यांची सेवा स्वीयेतर नियोक्त्याला आवश्यक वाटली नाही तर त्यांना मूळ विभागाकडे परत पाठविण्याची मुभा स्वीयेतर नियोक्त्याला राहील. मात्र याप्रमाणे परत पाठविण्यापूर्वी स्वीयेतर नियोक्त्याने शासनाला/सक्षम प्राधिकाऱ्याला तीन महिन्यांची नोटीस दिली पाहिजे; आणि

ड) त्यांनी मूळ विभागाकडे परत जाण्याचा आपला उद्देश आहे अशी कमीत कमी तीन महिन्यांची लेखी नोटीस शासनाला / सक्षम प्राधिकाऱ्याला दिल्यानंतर त्यांना मूळ विभागाकडे परत येण्याची मुभा राहील.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा... इ.) नियम १९८१ मधील नियम ४० (परिशिष्ट दोन) मधील तरतुदी विचारात घेऊन सामान्य प्रशासन विभागाने श्री.सुनिल रामचंद्र जोशी यांच्या प्रतिनियुक्तीबाबतच्या अटी व शर्ती ठरवाव्यात.

३. श्री.सुनिल रामचंद्र जोशी, अवर सचिव यांच्या इतर सर्व प्रशासकीय बाबी सामान्य प्रशासन विभागामार्फत हाताळण्यात येतील.

४. श्री.सुनिल रामचंद्र जोशी, अवर सचिव यांना प्रतिनियुक्तीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाने कार्यमुक्त करावे. **श्री.जोशी यांच्या सेवा लोकसभा निवडणूक २०१९ करीता अधिग्रहीत करण्यात आल्या असल्यास त्यांनी प्रथमत: निवडणूक कामकाजासाठी विहीत केलेले कर्तव्य बजावणे आवश्यक राहील, त्यानंतरच त्यांना प्रतिनियुक्तीसाठी कार्यमुक्त करावे.**

५. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०३२८१७२४३१७७०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gajanan Bhimrao Gurav

Digitally signed by Gajanan Bhimrao Gurav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8a5b973b0795ae988a7c005050f9180a8021798a5c1ed41ad a8a72725a47b4f0, serialNumber=54b11b1ccbdc577d71dce3b313c3fef5dc2ad659e360f 73b682d6b6fccb8aecf, cn=Gajanan Bhimrao Gurav
Date: 2019.03.28 17:26:55 +05'30'

(ग.भि.गुरव)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव
३) अ.मु.स (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
४) उप सचिव (आस्थापना), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
५) उप सचिव (कार्या.१२ अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
६) संचालक, नाशिक महसूल प्रशिक्षण प्रबोधिनी तथा विभागीय प्रशासकीय प्रशिक्षण संस्था, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिकरोड, नाशिक - ४२२ १०१
७) श्री.सुनिल रामचंद्र जोशी, अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ (प्रशासकीय विभागामार्फत)
८) कार्या.१४ संग्रहार्थ